Impact Factor - 6.8
ISSN- 0474-9030

International Multidisciplinary UGC CARE Listed Journal for Research Publication

# OUR HERITAGE

PEER REVIEWED [REFEREED] INDEXED
UGC CARE LIST GROUP - B RESEARCH JOURNAL
VOL- 68, ISSUE-35, FEBRUARY -2020:
SPECIAL ISSUE ON MULTIDISCIPLINARY STUDIES



# GENDER EQUALITY AND WOMEN EMPOWERMENT

Chief Editor
**Dr. Ansari Md. Haroon Md. Ramzan**
J.A.T Arts, Science & Commerce College
[For Women], Malegaon, Nashik.

Executive Editor
**Dr. Lodhi Kaniz Fatma Niyaz Ahmad**

Associate Editor
**Dr. Salma Ab. Sattar**

# CONTENT


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | भारतातील महिला उद्योजकतेचा अभ्यास | **निलेश भगवान महाजन**<br>सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग<br>कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,रावळगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक. | 01-04 |
| 2 | शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची महिला विषयक भुमिका | **प्रा.डॉ अजय पाटील**<br>मुळा एज्यकेषन सोसायटीचे<br>श्री ज्ञानेष्वर महाविदयालय नेवासा जि.अहमदनगर | 05-09 |
| 3 | "संगीत व महिला सबलीकरण" | **डॉ. नरेश एल. गोंडाणे**<br>सहयोगी प्राध्यापक, संगीत विभाग प्रमुख,<br>आर. डी. जी. महिला महाविद्यालय, अकोला, जि. अकोला (महाराष्ट्र) | 10-11 |
| 4 | भारतीय राज्यघटना व महिला विषयक कायदे | **प्रा. गारूळे गणेष लक्ष्मण**<br>मुळा एज्युकेषन सासायटीचे श्री ज्ञानेष्वर<br>महाविदयालय, नेवासा ता. नेवासा जि. नगर | 12-15 |
| 5 | भारतीय राजकारणातील महिलांची भुमिका आणि कार्ये | **प्रा.डॉ किषोर गटकळ**<br>मुळा एज्यकेषन सोसायटीचे श्री ज्ञानेष्वर<br>महाविदयालय नेवासा जि. अहमदनगर | 16-20 |
| 6 | महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीचा उदय व विकास | **जिजाभाऊ सिताराम घुले**<br>**संशोधक**–स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड.<br>संशोधन केंद्र पिंपल्स कॉलेज, नांदेड<br>**मार्गदर्शक–डॉ.संजय गायकवाड**<br>योगानंद स्वामी कला महाविदयालय, वसमतनगर | 21-24 |
| 7 | स्त्री–मुक्ती आंदोलनाच्या आद्य प्रणेत्या -: सावित्रीबाई फुले | **प्राभरत केवळ आहेर .**<br>इतिहास विभाग, एससंस्थेचे.एम.पी.व्ही.एस.एस. कलावाणिज्य ,<br>,व विज्ञान महाविद्यालय<br>रावळगाव तानाशिक .मालेगाव जि . | 25-28 |
| 8 | महिला सबलीकरण आणि भटक्या विमुक्तातील स्त्रिया एक अभ्यास | **प्राअंबादास नरसिंगराव पाचंगे .**<br>राज्यशास्त्र विभाग, एससंस्थेचे.एम.पी.व्ही.एस.एस.<br>कलामालेगाव .रावळगाव ता ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,<br>नाशिक .जि | 29-33 |
| 9 | महिला सक्षमीकरणात न्यायव्यवस्थेची भूमिका | **प्रा. नारायण मधुकर राजूरवार**<br>मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमवरनगर, ता.<br>बारामती, जि. पुणे | 34-39 |

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | राजकीय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग | **डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल**<br>सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग श्री पद्ममणि जैन महाविद्यालय पाबळ | 40-45 |
| 11 | "संगीत व स्त्री समानता" | **प्रा. अशोक एस. जाधव**<br>सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, संगीत विभाग, एस. पी. एच. महिला महाविद्यालय, मालेगांव कॅम्प, जि. नाशिक (महाराष्ट्र) | 46-47 |
| 12 | भारतीय राजकारणातील महिला | **प्रा. अभिलाषा दर्पण शिंदे**<br>सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र)<br>म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगांव कॅम्प ता. मालेगाव नाशिक | 48-51 |
| 13 | लिंगाधिष्ठीत अर्थसंकल्प एक विचार प्रवाह | **सुभाष लक्ष्मण अहिरे**<br>सहयोगी प्राध्यापक (इतिहास)<br>के.बी. एच. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय निमगांव ता. मालेगांव जि. नाशिक | 52-54 |
| 14 | महिलांच्या राजकीय सहभागाचा विश्लेषनात्मक अभ्यास | **प्रा. शरद अर्जुन वाघ**<br>राज्यशास्त्र विभाग प्रमुख<br>कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, निमगांव ता. मालेगांव जि. नाशिक | 55-60 |
| 15 | महिला सबलीकरण – राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक भूमिका | **प्रा.डॉ. संभाजी शामराव तनपुरे,**<br>सहाय्यक प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, भेंडे बु.।। त. नेवासा जि. अहमदनगर, | 61-68 |
| 16 | स्त्रीवादी साहित्यातून महिला सबलीकरण | **प्रा. वर्षा योगेश आहिरे**<br>सहा. प्राध्यापक (मराठी) म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प, मालेगांव. | 69-71 |
| 17 | महाराष्ट्रातील विधवा पुनर्विवाह चळवळीचा आढावा | **प्रा. योगेश किरण हिरे**<br>महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, मालेगाव. | 72-75 |

| | | | |
|---|---|---|---|
| 18 | **गांधीजी आणि महिला सबलीकरण** | **प्रा. डॉ. मीनाक्षी पाटील**<br>सहाय्यक प्राध्यापक, महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगांव कॅम्प, मालेगांव, जि. नाशिक. | 76-79 |
| 19 | **महिला सशक्तिकरण आणि देशाची आर्थिक प्रगती** | **डॉ. बी. एम. सोनवणे**<br>सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग म.स.गा. महाविद्यालय मालेगांव कॅम्प ता. मालेगांव (नाशिक) | 80-84 |
| 20 | भारतीय स्त्री–स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास : वेदकाळ ते अठरावे षतक | **श्री. विलास आत्माराम देऊलकर,**<br>सहयोगी प्राध्यापक, इतिहास बॅ. बाळासाहेब खर्डेकर कॉलेज, वेंगुर्ला, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग. | 85-89 |
| 21 | **भारतातील महिला सक्षमीकरणाचे अध्ययन** | **डॉ.डी.एन.सोनवणे**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय निमगांव, मालेगाव | 90-95 |
| 22 | भारतीय संविधानातील महिलांचे राजकीय स्थान व वस्तूस्थिती | प्रा. अंकुश गंगाराम सुर्यवंशी<br>विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ | 96-99 |
| 23 | भारतातील स्त्रीवादी दृष्टीकोन आणि बदलते प्रवाह | प्रा. विलास नाबदे,<br>सहा.प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, अहमदनगर महाविदयालय, अहमदनगर | 100-104 |
| 24 | **महिलांना संरक्षण देणारे कायदे : एक चिकित्सक अभ्यास** | **प्रा. डि. झेड. साळवे**<br>**सहाय्यक प्राध्यापक (इतिहास) एस.पी.एच. महिला महाविद्यालय मालेगाव** | 105-109 |
| 25 | भारतातील स्त्रीवादी चळवळींचा आढावा | डॉ. सुनील जे.<br>कवडेराज्यशास्त्र विभागप्रमुख अहमदनगर महाविदयालय अहमदनगर. | 110-116 |
| 26 | भारतातील स्त्री मुक्तीची चळवळ पुरस्कार करणारे समाजसुधारक | प्रा.कानवडे जी.बी.<br>राज्यशास्त्र विभाग प्रमुख<br>रमेश फिरोदिया कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय साकुर ता.संगमनेर, जि.अ.नगर | 117-119 |

# महिला सशक्तिकरण आणि देशाची आर्थिक प्रगती

**Women's Empowerment and the Country's Economic Development**

**डॉ. बी. एम. सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग
म.स.गा. महाविद्यालय मालेगांव कॅम्प ता. मालेगांव (नाशिक)

**गोषवारा** – देशातील एकूण लोकसंख्येत निम्मी लोकसंख्या ही महिलांची आहे. महिलांना स्वावलंबी व आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केले आहेत. भारताच्या संसदेत महिलांना अधिकाधिक सशक्त बनविण्यासाठी योजना व कायदे तयार करण्यात आले आहेत. भारताच्या संविधानाने देखील समानतेचा मुलभूत हक्क दिलेला असल्यामुळे 21 व्या शतकातील महिला या आपल्या कार्यकत्तृत्वाने जगामध्ये ओळखल्या जाऊ लागल्या आहेत. आज महिला या शेती, उद्योग – व्यावसाय, चित्रपट, संशोधन, वैद्यकिय, शैक्षणिक, पर्यटन क्षेत्रात कार्य करताना दिसत आहे. यामुळे भारतातील महिला सशक्त झालेल्या दिसुन येतात. आज जागतिकीकरणाच्या वाढत्या महत्वामुळे महिलांना त्यांच्यातील सुप्तगुण दाखविण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे महिलांना सन्मान मिळत आहे. हा सन्मान भारतातील सर्वच महिलांना मिळालेला दिसून येत नाही. भारतात सुमारे पावनेसहा लक्ष खेडी आहेत. खेड्यातील 68% महिला पुरूषांच्या वर्चस्वाखाली जीवन जगताना दिसतात. यातील बहुतांश महिला कर्तबगार आहेत मात्र त्यांना पुरूषांच्या पूर्व परवाणगी शिवाय कोणताही निर्णय घेता येत नाही. मात्र महिलांशिवाय राष्ट्राची आर्थिक प्रगती होणे शक्य नाही हे पश्चिमात्य देशाच्या आर्थिक प्रगतीवरूण लक्षात येते. भारत जगातील सातव्या क्रमांकाची मोठी अर्थव्यावस्था आहे पण जगात भारताची ओळख विसनशील देश अशीच आहे. जेव्हा भारताच्या ग्रामीण भागातील 68% महिला या पुरूषांच्या वर्चस्वाखाली न राहता त्या पुरूषांच्या बरोबरीने जीवन जगु लागतील, आर्थिक निर्णय घेऊ लागतील तेव्हाच महिला सशक्तीकरण होऊन राष्ट्राची आर्थिक प्रगती होईल.

**किवर्ड** – महिला सशक्तीकरण, स्वावलंबन, स्वयंरोजगार, पुरुषप्रधान, आर्थिक प्रगती.

**प्रस्तावना** – भारतात जगातील दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या आहे. 2019 मध्ये भारताची एकुण लोकसंख्या 136 कोटी ऐवढी होती. एकुण लोकसंख्येत 48.20% लोकसंख्या स्त्रीयांची आहे तर 51.80%


Copyright© 2020

OUR HERITAGE
ISSN: 0474-9030
Impact Factor – 6.8

लोकसंख्या पुरुषांची आहे.(1) भारतात स्वातंत्र्यानंतर आर्थिक – समाजिक विकासाच्या अनेक योजना शासन स्थरावरून राबविण्यात आल्या. विशेष करून महिलांसाठी शासकीय योजना सुरू करण्यात आल्या पण भारताला स्वातंत्र्य मिळूण 71 वर्ष पुर्ण झाले आहेत मात्र अजुनही स्त्रीयांना पुरूषांच्या तुलनेत दुय्यम स्वरूपाची वागणूक दिली जाते हे लोकसंख्या वाढीच्या स्त्री – पुरूष प्रमाणावरूनही स्पष्ट होते. 2019 मध्ये दर 1000 पुरूषांमागे स्त्रीयांची संख्या 930 ऐवढी नोंविण्यात आली. यावरून स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टीकोण अजूनही म्हणावा तसा बदललेला दिसून येत नाही. परंतू मागील दोन – तीन दशकांपासुन स्त्रीयांच्या सक्षमीकरणासाठी शासन स्थरावरून मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत. म्हणुनच जागतिकीकरणानंतर भारतातील महिला आर्थिक विकासाचा महत्वपूर्ण घटक म्हणुन नावारूपाला येऊ लागल्या आहेत. या संदर्भात विवेचन सदर लेखात करण्यात आले आहे.

**संशोधन लेखाची उद्दिष्टे –**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

1) महिला सशक्तीकरणाचा अर्थ स्पष्ट करणे.

2) महिला सशक्तीकरणासाठी शासनाचे प्रयत्न अभ्यासणे

3) देशाच्या सर्वांगिण आर्थिक विकासात महिलांचे योगदान अभ्यासणे.

**संशोधन प्रणाली** – प्रस्तुत लेखाची मांडणी करण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन साधनांचा उपयोग करून घेतला आहे. यात प्रामुख्याने भारत सरकारच्या सांख्यिकीय मंत्रालयाचे संकेत स्थळ, ग्रामीण मंत्रालयाचे संकेत स्थळ, संयुक्त राष्ट्राचे संकेत स्थळ, महाराष्ट्र शासनाचे महिला व बालविकास विभागाचे संकेत स्थळ, पूर्व प्रकाशित पुस्तके व मासिके तसेच वर्तमान पत्रात प्रकाशित लेखांचा संदर्भ विचारात घेतलेला आहे. प्राप्त महितीच्या स्पष्टीकरणासाठी 'विश्लेषण तंत्राचा' वापर केला आहे.

**महिला सशक्तीकरण** – 1) आर्थिक दृष्टीकोणातुन महिलांना सर्व क्षेत्रात भाग घेण्यासाठी सशक्त बनवुन व अर्थव्यावस्थेच्या विकासासाठी व स्थैर्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर निश्चित केलेल्या ध्यैयांना प्राप्त करण्यासाठी महिलांना संधी उपलब्ध करून देणे याला महिला सशक्तीकरण असे म्हणतात.(2)


Copyright© 2020

2) कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासासाठी संधी उपलब्ध करूण देणे, आणि स्त्री – पुरूष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात. (3)

वरील व्याख्यांवरून महिला सक्षमीकरणाचा अर्थ स्पष्ट होतो. थोडक्यात पुरूषांच्या बरोबरीने कोणताही भेदभाव न करताना महिजांना समान संधी उपलब्ध करून देऊन आर्थिक व सामाजिक दृष्टकोणातुन सक्षम बनविणे यालाच महिला सशक्तीकरण असे म्हणावे लागेल.

**स्पष्टीकरण** – भारताच्या संविधानात लैगिक समानतेचा सिध्दांत हा संविधानातील प्रस्तावना, मुलभूत अधिकार, मुलभूत कर्तव्य आणि निर्देशक तत्वात समाविष्ट करण्यात आलेला आहे. (4) भारतात लोकशाही मार्गाने विविध योजना आणि कार्यक्रमांच्या माध्यमाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. भारतात पाचव्या पंचवार्षिक (1974-78) योजनेपासून महिलांच्या सर्वागिण विकासाच्या दृष्टीकोणात बदल होऊ लागला. महिला सशक्तीकरण घडवून आणण्यासाठी महिलांच्या अधिकारांचे कायद्यान्वये संरक्षण करण्यासाठी 1991 मध्ये 'राष्ट्रीय महिला आयोग' ची स्थापना करण्यात आली. तसेच 1993 मध्ये संविधानाची 73 वी आणि 74 वी घटना दुरूस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकित महिलांना प्रतिनिधीत्व करण्यासाठी राखीव जागांची संवैधानिक तरतुद करण्यात आली. महिला व बालकांच्या विकासासाठी आर्थिक वर्ष 2005-06 पासुन अर्थसंकल्पात विशेष तरतुद करण्यात येऊ लागली आहे. यामुळे आता महिलांच्या योग्यतेत, कार्यक्षमतेत व विविध उपक्रमात सहभाग घेण्याच्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे दिसून येते. महिला आता शेती बरोबरच, उद्योग, शिक्षण, न्याय पालिका, राजकारण, समाजकारण, संशोधन, वैद्यकिय, पर्यटन, संरक्षण, विदेश, चित्रपटसृष्टी, प्रशासन, प्रशिक्षण, क्रिडा, गिर्यारोहण अशा कितीतरी क्षेत्रात नावलौकिक मिळवत आहेत. हे महिला सक्षमीकरणामुळे साध्य झाले आहे. क्षमता व कौशल्यानुरूप क्षेत्राची निवड करण्याची व कतृत्व दाखविण्याची संधी मिळालेली असल्यामुळे भारतीय महिला देशाच्या सर्वोच्च पातळीवर जाऊन पोहचल्या आहेत. यामुळे राष्ट्राच्या उभारणीत व आर्थिक विकासात महिला पुरूषाच्या बरोबरीने किंबहुणा पुरूषापेक्षा जास्त सहभागी झालेल्या असल्याचे वास्तव आपल्याला दिसून येते.


Copyright© 2020

देशाचा आर्थिक विकास हा देशातील विविध क्षेत्रात भरीव गुंतवणूक करून व अत्याधुनिक तंत्राचा वापर उत्पादन प्रकियेत करून होत असतो. तसेच देशत कुषल व पुरेशे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असेल तर विकास प्रकियेला गतिमाणता प्राप्त होते. महिलांच्या आर्थिक विकासासाठी जागतीक महिला दिनानिमीत्त 24 फेब्रुवारी 1975 पासुन महाराष्ट्र शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली. आणि 20 जानेवारी 2003 पासुन महिला आर्थिक विकास महामंडळला बचत गटाशी जोडून महिला सक्षमीकरणाच्या अनेक योजना राबविण्यास सुरूवात झाली आहे.[5] यामुळे महिला या संघटीत होऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय यशस्वी रित्या चालवित आहेत. भारतात जगातील दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या आहे. यामुळे रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो. केवळ शासन पुरस्कृत रोजगार हा सर्व लोकांसाठी पर्याय ठरू शकत नाही. म्हणुन रोजगार निर्माण करण्याची क्षमता लोकांमध्ये निर्माण झाली पाहिजे यासाठी स्वयंम रोजगार व स्वयंमरोजगारामधुन रोजगार निर्मीती साध्य करण्यासाठी शासन महिला उद्योजक निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहे. केंद्र शासनाने महिलांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. भारत सरकारच्या सांख्यिकीय व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने सहाव्या आर्थिक जनगणनेच्या अहवालात भारतातील एकूण उद्योजकांमध्ये महिला उद्योजकांचे प्रमाण 14% नोंदले आहेत.[6] या अहवालानुसार समाजाच्या सर्व स्थरातुन महिला उद्योजक निर्माण झालेल्या आहेत. स्पोर्टस पासुन बांधकाम, सुरक्षा आणि गुप्तहेर सारख्या संस्था चालवण्यात महिला आता आघाडीवर आहेत. आणि उल्लेखनिय बाब अशी समोर आलेली आहे की, महिला उद्योजकांपैकी 58% महिलांनी वयाच्या 20 ते 30 वर्षाच्या असताना त्यांचा स्वत:चा व्यवसाय चालु केला होता. भारताने महिला सशक्तीकरणाला पोषक धोरण तयार करून त्या धोरणाची प्रभावी अंमलबजावनी केल्या मुळेच महिलांना कार्यकतृत्व दाखवायला संधी मिळाली.

वरील लेखावरून असे स्पष्ट होते की, देशात महिला सक्षमीकरण घडवुन आणल्यामुळे राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला मोठ्या प्रमाणात चालणा मिळाली. या लेखाचे आणखी काही महत्वपूर्ण निष्कर्ष पुढील प्रमाणे –

1) भारतात संविधाने महिला व पुरूष समानतेचे तत्व स्विकारले आहे.


Copyright© 2020

2) महिलांना आर्थिक व सामाजिक क्षेत्रात सहभाग घेण्यासाठी शासनाला काही कायदे व नियम तयार करावे लागले.
3) महिलांच्या व बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी व कार्य करण्यासाठी शासनाने स्वतंत्र मंत्रालयाची निर्मीती केलेली आहे.
4) महिलांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण घडवुण आणण्यासाठी देशात पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून प्रभावी उपाययोजना तयार करण्यात येऊ लागल्या आहेत.
5) महिलांना राखीव जागांची तरतुद संविधाच्या माध्यमाने केल्यामुळे महिलांना नेतृत्व करण्याची संधी मिळू लागली.
6) महिलांच्या उद्‌यमशिलतेला चालणा देण्यासाठी शासनाने नाममात्र दरात कर्जपुरवठा व बचत गटाच्या माध्यमाने कृतीशिल उपक्रम हाती घेण्यास चालना दिली आहे.
7) महिला सक्षमीकरण धोरणामुळे आज देशतील सर्वच क्षेत्रात महिला राष्ट्राच्या प्रगतीत हातभार लावीत आहेत.

**संदर्भ –**

1) Ministry of Statistics & Programme Implementation - 16 May 2019
2) https://www.unwomen.org
3) https://mr.m.wikipedia.org
4) भारताचे संविधान - पृष्ठ क्रमांक 1 ते 70
5) https://womenchild.maharashtra.gov.in
6) https://startupindia.gov.in


Copyright© 2020